बुधवार दि. २२ जुलै २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ३२१ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

[illegible] हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

### जालन्यात आरक्षण उपवर्गीकरणाविरोधात भव्य जनआक्रोश मोर्चा

# लोकभावनेचा आदर करा, अन्यथा जनता सत्तेतून खाली खेचेल - आनंदराज आंबेडकर

*डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापासून अंबड चौफुलीपर्यंत हजारोंचा मोर्चा; जंतरमंतर आंदोलनाला जाहीर पाठिंबा, टीईटी-नीट पेपरफुटीप्रकरणी सरकारवर जोरदार टीका*







**जालना -प्रतिनिधी**

अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या विरोधात जालन्यात मंगळवारी विविध आंबेडकरी संघटना, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांच्या सहभागातून भव्य जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला. ''आरक्षण वाचवा, संविधान वाचवा'' अशा घोषणांनी शहर दणाणून गेले. मोर्चानंतर झालेल्या जाहीर सभेत व प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय नेते आनंदराज आंबेडकर यांनी राज्य आणि केंद्र सरकारवर जोरदार टीका करत, जनतेच्या भावना दुर्लक्षित केल्यास सत्ताधाऱ्यांना त्याची मोठी राजकीय किंमत मोजावी लागेल, असा थेट इशारा दिला.



मोर्चाची सुरुवात मस्तगड येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून झाली. त्यानंतर गांधी चमन, शनी मंदिर मार्गे मोर्चा अंबड चौफुलीपर्यंत पोहोचला. या ठिकाणी मोर्चाचे रूपांतर जाहीर सभेत झाले. सभेनंतर जिल्हा प्रशासनाला विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. संपूर्ण मोर्चादरम्यान पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता. शहरातील प्रमुख मार्गांवरील वाहतूक काही काळासाठी पर्यायी मार्गाने वळविण्यात आली.

**सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा चुकीचा अर्थ लावला जात आहे**

सभेला संबोधित करताना आनंदराज आंबेडकर म्हणाले की, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा चुकीचा अर्थ लावून आरक्षणातील उपवर्गीकरणाची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केला जात आहे. न्यायालयाच्या नावाखाली समाजात संभ्रम निर्माण करून अनुसूचित जाती समाजामध्ये फूट पाडण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप त्यांनी केला.

''आरक्षण हा घटनात्मक अधिकार असून त्यामध्ये हस्तक्षेप करण्याचा कोणताही प्रयत्न आम्ही सहन करणार नाही. सरकारने लोकशाहीचा आणि जनतेच्या मताचा आदर केला पाहिजे. जर लोकभावना दुर्लक्षित करून निर्णय लादण्याचा प्रयत्न झाला, तर जनता सत्ताधाऱ्यांना सत्तेवरून खाली खेचल्याशिवाय राहणार नाही,'' असे ते म्हणाले.

त्यांनी स्पष्ट केले की, आरक्षण उपवर्गीकरणाच्या विरोधातील लढा आता अधिक व्यापक करण्यात येणार असून राज्यभर जनजागृती, आंदोलन आणि संघटनात्मक पातळीवर संघर्ष सुरू ठेवण्यात येईल.

**जंतरमंतरवरील आंदोलनाला जाहीर पाठिंबा**

दिल्लीतील जंतरमंतर येथे सुरू असलेल्या आंदोलनालाही आनंदराज आंबेडकर यांनी जाहीर पाठिंबा व्यक्त केला. आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित लाठीमाराचा निषेध करत त्यांनी सरकारवर टीका केली.

''लोकशाहीमध्ये शांततापूर्ण आंदोलन करणे हा प्रत्येक नागरिकाचा अधिकार आहे. विद्यार्थ्यांच्या मागण्या ऐकून घेण्याऐवजी त्यांच्यावर बळाचा वापर करणे अत्यंत दुर्दैवी आहे. विद्यार्थ्यांचा आवाज दडपण्याऐवजी त्यांच्या प्रश्नांवर सरकारने सकारात्मक भूमिका घ्यावी,'' अशी मागणी त्यांनी केली.

**टीईटी-नीट पेपरफुटीवर सरकारला धारेवर**


शैक्षणिक क्षेत्रातील वाढत्या गैरव्यवहारांवरही त्यांनी सरकारवर कठोर शब्दांत टीका केली. टीईटी, नीट आणि इतर स्पर्धा परीक्षांच्या प्रश्नपत्रिका वारंवार फुटत असल्याने लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात आले असल्याचे त्यांनी नमूद केले.

''पेपरफुटीच्या घटना ही केवळ प्रशासकीय चूक नसून विद्यार्थ्यांच्या भविष्याशी *(पान २ वर)*

## एल-निनोच्या पार्श्वभूमीवर जालना जलकवच अभियानाला वेग
## कॅच द रेन अंतर्गत जलसंधारणाची कामे तातडीने पूर्ण करण्याचे
### जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांचे निर्देश

**जालना - प्रतिनिधी**

संभाव्य एल-निनो परिस्थितीमुळे उद्भवू शकणाऱ्या पाणीटंचाईचा सामना करण्यासाठी शासनाच्या कॅच द रेन व जालना जलकवच अभियान २०२६ अंतर्गत जिल्ह्यात जलसंधारणाची कामे युद्धपातळीवर राबविण्यात येणार आहेत. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी रविवारी दूरदृश्यप्रणालीच्या माध्यमातून



जालना महानगरपालिका तसेच जिल्ह्यातील सर्व नगरपरिषदा व नगरपंचायतींचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि संबंधित अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेत मार्गदर्शन केले. बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांनी अभियानाची उद्दिष्टे, अंमलबजावणीची कार्यपद्धती आणि निश्चित कालावधीत पूर्ण करावयाच्या सात प्रमुख कृती कार्यक्रमांची सविस्तर माहिती दिली. एल-निनोमुळे अनियमित पर्जन्यमान, भूजल पातळीत होणारी घट तसेच पिण्याच्या व सिंचनाच्या पाण्याची संभाव्य टंचाई लक्षात घेता सर्व विभागांनी समन्वयाने जलसंधारण *(पान २ वर)*



महाराष्ट्र राज्याचे कुशल व कर्तबगार मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसा निमित्त त्यांची मुंबई येथे वर्षा निवासस्थानी भेट घेऊन जालन्याचे माजी आमदार तथा भाजपा नेते कैलास गोरंटयाल यांनी शुभेच्छा दिल्या.याप्रसंगी भाजपा नगरसेवक विरेंद्र धोका आणि इतरांची उपस्थिती होती.

# राष्ट्रीय कराटे स्पर्धेसाठी जालन्याचे १५ कराटेपटू दिल्लीला रवाना; सेन्साई रूपेंद्र पारचा यांच्याकडे महाराष्ट्र संघाचे टीम मॅनेजरपद

*तालकटोरा इंटरनॅशनल स्टेडियमवर २३ व २४ जुलैला होणार राष्ट्रीय स्पर्धा; जालन्याच्या खेळाडूंकडून पदकांची अपेक्षा*

**जालना - प्रतिनिधी**

स्टेअर्स युथ गेम्स राष्ट्रीय कराटे स्पर्धा २०२५-२६ अंतर्गत दिल्ली येथील तालकटोरा इंटरनॅशनल स्टेडियममध्ये २३ व २४ जुलै २०२६ रोजी होणाऱ्या राष्ट्रीय कराटे स्पर्धेसाठी जालना जिल्ह्यातील १५ गुणवान कराटेपटू महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी दिल्लीला रवाना झाले आहेत. विशेष म्हणजे, या स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघाच्या टीम मॅनेजरपदी जालना येथील सेन्साई रूपेंद्र गोपाल पारचा यांची नियुक्ती झाल्याने जिल्ह्याच्या क्रीडा क्षेत्रासाठी हा अभिमानाचा क्षण ठरला आहे.



जालना जिल्ह्यातील कराटेपटूंनी राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये सातत्यपूर्ण उत्कृष्ट कामगिरी करत राष्ट्रीय स्तरावर आपले स्थान निर्माण केले आहे. त्याच यशाच्या बळावर यंदा तब्बल १५ खेळाडूंना महाराष्ट्र संघातून राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड मिळाली आहे. त्यामुळे या स्पर्धेत जालन्याच्या खेळाडूंकडून पदकांची मोठी अपेक्षा व्यक्त होत आहे.

राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणाऱ्या जालना जिल्ह्यातील खेळाडूंमध्ये कु. निवांशी नवीनकुमार वलकट्टी (नारायणा ई-टेक्नो स्कूल), कु. अनुष्का किशोर म्हेत्रे (नवयुवक गणेश माध्यमिक विद्यालय), कु. तन्वी नितीन खरटमल (राजश्री शाहू इंग्लिश स्कूल), कु. आरुषी नवीनकुमार वलकट्टी (नारायणा ई-टेक्नो स्कूल), कु. वैष्णवी बाबासाहेब लोखंडे (पोद्दार इंटरनॅशनल स्कूल), कु. आकांक्षा शंकर चिल्का (श्री म. स्था. जैन विद्यालय), कु. वैष्णवी संतोष लुटे (राष्ट्रीय हिंदी विद्यालय इंग्लिश मीडियम), कु. दिव्यता अजितराज कोठारी (श्री म. स्था. जैन इंग्लिश स्कूल), कु. लावण्या किशोर गुडला (जे.ई.एस. कॉलेज), कु. पूर्वा सुजित माने (श्रीमती इंदिरा गांधी कॉलेज, रामनगर), ऋषिकेश गणेश श्रीराम (नारायणा ई-टेक्नो स्कूल), यशवर्धन शंकर चिल्का (श्री म. स्था. जैन इंग्लिश स्कूल), नयन धनराज गोमतीवाले (जे.ई.एस. कॉलेज), शेलमॉन योहान गुडेकर (जे.ई.एस. कॉलेज) आणि ओंकार गुट्टे (जे.ई.एस. कॉलेज) यांचा समावेश आहे.

या सर्व खेळाडूंना जालना जिल्ह्याचे चीफ को-ऑर्डिनेटर सेन्साई रूपेंद्र पारचा तसेच प्रशिक्षक सेन्साई अमन पारचा यांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन लाभले आहे. त्यांच्या मेहनतीमुळे आणि नियोजनबद्ध प्रशिक्षणामुळे जालना जिल्ह्यातील कराटेपटूंनी राज्य व राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरीची परंपरा निर्माण केली आहे. स्पर्धेसाठी निवड झालेल्या खेळाडूंचे स्टेअर्स जालना जिल्ह्याचे अध्यक्ष दीपक शेळके, उपाध्यक्ष गणेश श्रीराम, उपाध्यक्ष प्रशांत पेम्बरती, जालना महानगरपालिकेचे उपमहापौर राजेश राऊत, नगरसेवक महावीर ढक्का, राहुल मांडोत, संजय भगत, रितेश अग्रवाल, तसेच श्री म. स्था. जैन इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका श्रीमती कुलकर्णी, श्री म. स्था. जैन विद्यालयाचे मुख्याध्यापक वानगोता सर, श्री म. स्था. जैन प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती पोरवाल, नारायणा ई-टेक्नो स्कूलच्या मुख्याध्यापिका जॉन वेसली, व्यंकट राजू गुडला, यादव बापू, आशिष उपाध्याय, रितेश जयस्वाल आणि पालकवर्ग यांनी अभिनंदन करून राष्ट्रीय स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरीसाठी शुभेच्छा दिल्या. जालना जिल्ह्यातील कराटे क्षेत्रासाठी ही मोठी उपलब्धी मानली जात असून, राष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणाऱ्या या खेळाडूंकडून सुवर्णपदकांसह उल्लेखनीय यशाची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. त्यांच्या यशामुळे जिल्ह्यातील इतर विद्यार्थ्यांनाही कराटेकडे प्रेरणा मिळेल, असा विश्वास क्रीडाप्रेमींनी व्यक्त केला आहे.

# संपादकीय....

## मतदार यादी पुनरावलोकनाची घाई नको; प्रत्येक पात्र मतदाराचा अधिकार सर्वोच्च

विशेष सघन मतदार यादी पुनरावलोकन ही केवळ प्रशासकीय प्रक्रिया नाही, तर लोकशाहीच्या पायाभरणीशी निगडित असलेली अत्यंत महत्त्वाची जबाबदारी आहे. मतदार यादीत प्रत्येक पात्र नागरिकाचे नाव असणे आणि अपात्र नावे वगळली जाणे ही निवडणूक प्रक्रियेच्या विश्वासार्हतेसाठी आवश्यक बाब आहे. त्यामुळे ही प्रक्रिया वेगवान असण्याइतकीच सर्वसमावेशक, पारदर्शक आणि अचूक असणेही महत्त्वाचे आहे. फेडरेशन ऑफ महाराष्ट्र मुस्लिम्सने प्रक्रियेस आणखी दोन महिन्यांची मुदतवाढ देण्याची मागणी केली आहे. या मागणीमागील कारणांकडे केवळ एका संघटनेची भूमिका म्हणून न पाहता, राज्यातील प्रत्यक्ष परिस्थितीच्या संदर्भातही विचार करण्याची गरज आहे. खरीप हंगाम, धार्मिक कार्यक्रम, स्थलांतरित कामगार, दुर्गम भागातील नागरिक आणि तांत्रिक अडचणी यांसारख्या घटकांचा परिणाम मतदार नोंदणीवर होऊ शकतो, ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. लोकशाहीमध्ये मतदानाचा अधिकार हा केवळ एक अधिकार नसून नागरिक आणि राज्य यांच्यातील विश्वासाचा दुवा आहे. जर एखादा पात्र नागरिक केवळ वेळेअभावी, माहितीअभावी किंवा प्रशासकीय अडचणींमुळे मतदार यादीबाहेर राहिला, तर त्याचा परिणाम केवळ त्या व्यक्तीवर होत नाही; तो लोकशाहीच्या प्रतिनिधित्वावरही होतो. त्यामुळे ''वेळेत प्रक्रिया पूर्ण करणे'' आणि ''प्रत्येक पात्र नागरिकापर्यंत पोहोचणे'' यामध्ये योग्य समतोल राखणे आवश्यक आहे. याचबरोबर, वेळ वाढविण्याची मागणी स्वीकारायची की नाही, हा निर्णय वस्तुनिष्ठ आकडेवारी आणि निवडणूक आयोगाच्या तयारीच्या आधारेच व्हायला हवा. राज्यातील किती टक्के प्री-एसआयआर मॅपिंग पूर्ण झाले आहे, किती अर्ज प्रलंबित आहेत, कोणत्या जिल्ह्यांमध्ये अडचणी अधिक आहेत आणि विद्यमान मुदतीत प्रक्रिया पूर्ण होणे वास्तववादी आहे का, याचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन आवश्यक आहे. केवळ मुदत वाढविणे हा प्रत्येक समस्येचा उपाय ठरत नाही; तर प्रक्रियेची कार्यक्षमता वाढविणेही तेवढेच महत्त्वाचे आहे. या प्रक्रियेत आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे जनजागृती. अनेक नागरिकांना अर्ज कसा भरायचा, कोणती कागदपत्रे आवश्यक आहेत, ऑनलाइन सुविधा कशा वापरायच्या, याबाबत पुरेशी माहिती नसते. त्यामुळे स्थानिक भाषांमध्ये माहिती, अधिकृत व्हिडिओ, हेल्पलाइन, गावपातळीवरील शिबिरे आणि डिजिटल सहाय्य केंद्रे यांची आवश्यकता आहे. मतदार नोंदणी ही नागरिकांसाठी सुलभ प्रक्रिया झाली, तर मुदतवाढीची गरजही काही प्रमाणात कमी होऊ शकते. त्याच वेळी, , शिक्षक आणि इतर कर्मचाऱ्यांवर वाढणाऱ्या अतिरिक्त कामाच्या ताणाकडेही दुर्लक्ष करता येणार नाही. मर्यादित मनुष्यबळावर मोठ्या प्रमाणात काम सोपविल्यास प्रक्रियेतील चुका वाढण्याचा धोका असतो. त्यामुळे आवश्यक तेथे अतिरिक्त मनुष्यबळ आणि तांत्रिक सहाय्य उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे.

शेवटी, प्रश्न केवळ दोन महिन्यांच्या मुदतवाढीचा नाही; प्रश्न आहे एकही पात्र मतदार वंचित राहू नये याची खात्री करण्याचा. निवडणूक आयोगाने सर्व संबंधित घटकांचे म्हणणे ऐकून, प्रत्यक्ष परिस्थितीचे मूल्यमापन करून आणि लोकशाहीवरील विश्वास अबाधित ठेवणारा निर्णय घ्यावा. कारण मजबूत मतदार यादी हीच मजबूत लोकशाहीची पहिली अट आहे.


दैनिक युवा आदर्श दि. २२-०७-२०२६

CHANGE IN NAME

I Have change my name from
Old Name
Shaikh Naser shaikh Zaker
New Name
Naser jaker shaikh
As per my documents
Address - Devgaon.Tq.Badnapur Dist.
jalna 431202
Affidavit No. 77 AB 185534


## कुंभारझरी येथील हरिभक्त परायण सोनवणे महाराज यांची शिस्तप्रिय दिंडी, जाफराबाद तालुक्यातील महिलांचा मोठ्या प्रमाणात सहभाग

**दत्ता देशमुख**

पेरणीची कामे आटोपून हभप सोनवणे गुरुजींच्या नेतृत्वाखालील स्वग्राम पायी दिंडीत शेतकरी महिलांचा मोठा सहभाग पाऊस पडून शेतातील पेरणीची कामे आटोपल्याने जाफ्राबाद तालुक्यातील शेकडो शेतकरी महिला यंदा पायी दिंडीत सहभागी झाल्या आहेत. धनी मला बी आषाढी वारीला येऊ द्या की अशी साद घालत या महिलांनी पंढरीची वाट धरली आहे. जाफ्राबाद तालुक्यातील प.पू. हभप तथा जिल्हा परिषदेचे सेवानिवृत्त आदर्श शिक्षक सोनवणे गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली निघालेल्या स्वग्राम पायी दिंडीत सहा ते सातशे भाविक सहभागी झाले आहेत. यात १८ ते ७० वयोगटातील महिलांचा लक्षणीय सहभाग आहे. टेंभुर्णी, कुंभारझरी, धनगरवाडी परिसरातील महिला सकाळी लवकर उठून घर, गुरे आणि शेतीची कामे आटोपून डोक्यावर तुळशी वृंदावन व हाती टाळ घेऊन वारीत दाखल झाल्या आहेत.

## पुष्पाबाई भास्करराव दंडारे यांचे निधन

**जालना - प्रतिनिधी**



सौ. पुष्पाबाई भास्करराव दंडारे वय ७८ वर्ष यांचे मंगळवार, दिनांक २१/७/२०२६ रोजी दुपारी १ वाजता शिवनगर येथे राहत्या घरी दिर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्यावर रामतिर्थ स्मशान अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी मान्यवरांकडून त्याना आदरांजली वाहण्यात आली. शिक्षक बाबासाहेब दंडारे व छायाचित्रकार मधुसूदन दंडारे यांच्या त्या मातोश्री होत्या.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या उपस्थितीत कोल्हापूर आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमसाठी सामंजस्य करार

## कोल्हापूरमध्ये खेळाडूंना जागतिक दर्जाच्या सुविधा उपलब्ध होणार

**मुंबई - प्रतिनिधी**

कोल्हापूर येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट स्टेडियम उभारण्यासाठी मंत्रालयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री तथा क्रीडा व युवक कल्याण मंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या उपस्थितीत जिल्हा क्रिकेट असोसिएशन, कोल्हापूर आणि क्रीडा विभाग यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. या सामंजस्य करारामुळे भविष्यातील खेळाडूंना जागतिक दर्जाच्या सुविधा उपलब्ध होणार आहेत. यावेळी वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, सार्वजनिक आरोग्य मंत्री तथा कोल्हापूरचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर, राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षीरसागर, आमदार अमल महाडिक, कोल्हापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष छत्रपती संभाजीराजे, क्रीडा विभागाचे प्रधान सचिव रणजीत सिंह देओल, कोल्हापूरचे जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड, क्रीडा विभागाचे उप सचिव आबासाहेब कवळे, क्रीडा व युवक सेवा सहसंचालक सुधीर मोरे तसेच जिल्हा क्रिकेट असोसीएशनचे कार्यकारिणी सदस्य रामचंद्र पाटणकर व पदाधिकारी ऋतुराज इंगळे, अभिजीत भोसले, मदन शेळके उपस्थित होते. जागतिक दर्जाच्या



सुविधा ही संकल्पना केवळ क्रिकेटपुरती मर्यादित न राहता मल्टी स्पोर्ट्स हब म्हणून विकसित करण्यात येणार आहे. येथे बॉक्सिंग, ज्युडो, आर्चरी, कुस्ती, जलतरण, टेबल टेनिस, फेन्सिंग आदी खेळांसाठी अत्याधुनिक सुविधा निर्माण करण्यात येतील. तसेच क्रिकेट म्युझियम उभारण्यात येणार असून स्थानिकांना रोजगाराच्या नव्या संधीही उपलब्ध होणार आहेत. करवीर तालुक्यातील मौजे विकासवाडी येथील १२.७६ हेक्टर (३१.९० एकर) शासकीय जागा कोल्हापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशन () यांना आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियम व संबंधित क्रीडा पायाभूत सुविधा उभारण्यासाठी सामंजस्य कराराअंतर्गत हस्तांतरित करण्यात आली. कोल्हापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष छत्रपती संभाजीराजे व कोल्हापूर येथील क्रीडा व युवक सेवा उपसंचालक सुहास पाटील यांनी भाडेपट्टा करारनामा हस्तांतरणावर स्वाक्षरी केली. बीसीसीआय () आणि आयसीसी ()च्या निकषांनुसार सुमारे ३५ हजार प्रेक्षक क्षमतेचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्टेडियम उभारण्यात येणार आहे.

या प्रकल्पात आधुनिक पॅव्हेलियन, सराव मैदाने, इनडोअर प्रशिक्षण केंद्र, स्पोर्ट्स सायन्स सेंटर, क्लब हाऊस, फ्लडलाइट व्यवस्था, क्रिकेट म्युझियम, खेळाडू व अधिकाऱ्यांसाठी तसेच सर्वसामान्यांसाठी वाहनतळ, अंतर्गत रस्ते, ड्रेनेज व्यवस्था, सौर ऊर्जा प्रकल्प तसेच अत्याधुनिक सुरक्षा व्यवस्थाही उभारण्यात येईल. राज्यात जागतिक दर्जाच्या क्रीडा सुविधा उभारण्याच्या शासनाच्या संकल्पाला या प्रकल्पामुळे बळ मिळणार असून, कोल्हापूरच्या समृद्ध क्रीडा परंपरेला नवी दिशा मिळेल. या स्टेडियममुळे जिल्ह्यातील क्रिकेटला चालना मिळण्याबरोबरच ग्रामीण भागातील गुणवंत खेळाडूंना आधुनिक प्रशिक्षण सुविधा उपलब्ध होतील. तसेच या प्रकल्पाच्या माध्यमातून क्रीडा पर्यटनाला प्रोत्साहन मिळून स्थानिक अर्थव्यवस्थेलाही मोठी चालना मिळणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

# न्यायव्यवस्था आणि संसदची वस्तुस्थिती
# अखेर महाराष्ट्रात चाललंय तरी काय?

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हे महाराष्ट्रातील थोर समाजसुधारक, लोककवी आणि दलित साहित्याचे जनक होते. त्यांनी आपल्या साहित्यातून आणि भाषणांतून शोषक व्यवस्थेवर नेहमीच कठोर शब्दांत आसूड ओढले. अण्णाभाऊ म्हणाले होते की, न्याय व्यवस्था काहीकांची रखेल झाली, ही संसद देखील हिजड्याची हवेली झाली, मी माझ्या व्यथा मांडू कोणाकडे..? कारण इथली न्यायव्यवस्था भ्रष्टतेने रंगीन झाली. या विधानातून अण्णाभाऊंनी न्यायालये आणि न्याय देणा-या संस्थांवर ताशेरे ओढले आहेत. न्याययंत्रणा जेव्हा सामान्य जनतेला न्याय देण्याऐवजी सत्ताधा-यांची किंवा धनिकांची अंकित (गुलाम) बनते, तेव्हा तिच्यावर हा उपरोधिक आणि संतापजनक शब्दांत प्रहार केला जातो.

संसद जी लोकशाहीचे मंदिर मानली जाते, ती जेव्हा सामान्य जनतेचे प्रश्न सोडवण्यात असमर्थ ठरते आणि हतबल होते, तेव्हा तिला हिजड्यांची हवेली या उपरोधिक शब्दांनी संबोधले गेले आहे. याचा अर्थ असा की, जेव्हा सत्तेत बसलेले लोकप्रतिनिधी मुकदर्शक बनून अन्यायाकडे पाहतात आणि स्वतःच्या हक्कासाठी लढत नाहीत, तेव्हा ती संसद जनतेच्या दृष्टीने कमकुवत आणि निरुपयोगी ठरते. सांगायचं तात्पर्य म्हणजे सामान्य माणसाच्या व्यथांकडे दुर्लक्ष करणारी आणि भ्रष्टाचाराने बरबटलेली राजकीय व न्यायिक व्यवस्था यावर अण्णाभाऊंनी अत्यंत जळजळीत शब्दांत आपला रोष व्यक्त केला होता.

एकतर्फी प्रेमातील विकृत मानसिकतेच्या प्रत्यक्ष दर्शनाने वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट ह्या शहरातील एका जळीत कांडाने संपूर्ण महाराष्ट्र हादरून गेला होता. हिंगणघाट तालुक्यातील अंकिता पिसुड्डे नामक प्राध्यापिकेला ३ जानेवारी २०२० चा प्रभात कर्दनकाळ ठरला. नेहमीप्रमाणे अंकिता नंदोरी चौकातून कॉलेजला पायदळ निघाली होती. सकाळची वेळ असल्यामुळे रस्त्याने जास्त वर्दळ नव्हती. याच निरव शांततेचा पुरेपूर फायदा घेऊन विकेशने हिंगणघाट येथील नंदोरी चौकात अंकिताचा पाठलाग केला आणि अंकिताच्या अंगावर त्याने पेट्रोलची बाटली ओतून आग लावली. त्यामध्ये अंकिता गंभीररित्या भाजली गेली होती आणि उपचारादरम्यान १० फेब्रुवारी २०२० रोजी अंकिताने शेवटचा श्वास घेतला. अखेर दोन वर्षानंतर १० फेब्रुवारी २०२२ रोजी आरोपी विकेश नगराळे याला आजन्म कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली. जर या आरोपीला फाशी दिल्या गेली असती, तर वर्धा जिल्ह्यात अशा गुन्ह्यांची पुनरावृत्ती झाली नसती.

परंतु दुर्दैवाने नसरापूरच्या क्रुरतेची पुनरावृत्ती वर्धेत झाली आहे. वर्धा जिल्ह्यातील सावंगी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रोठा गावात माणुसकीला काळीमा फासणारी आणि काळीज पिळवटून टाकणारी एक घटना उघडकीस आली. जिथे एका १२ वर्षांच्या मुलीवर ३० वर्षीय राहुल राजु मडावी या जवळच्या नातेवाईक नराधमाने लैंगिक अत्याचार केल्यानंतर तिला दगडांनी ठेचून ठार मारले. ही हृदयद्रावक घटना सायंकाळी उघडकीस आली. १५ जुलै रोजी, जेव्हा पीडितेचे आई-वडील खरेदी करून घरी परतले, तेव्हा घरातील दृश्य इतके भयंकर होते की ते कोणाचेही हृदय पिळवटून टाकणारे होते. सकाळी शाळेत गेलेली आणि दुपारी लवकर घरी परतलेली पीडिता घरात नग्न आणि रक्ताने माखलेल्या अवस्थेत पडलेली आढळली. मुलीचा रक्ताच्या थारोळ्यात पडलेला मृतदेह, कुटुंबियांचा आक्रोश, मुलीची करण्यात आलेली अमानुष हत्येने संपूर्ण गावच सून्न झाले.

स्मार्ट मीटर बसविण्याच्या मोहिमेवरून महावितरण आणि ग्राहकांमधील वाद पुन्हा वाढण्याची शक्यता आहे. नागपूरात महावितरण कडून जुन्या मीटरच्या जागी सक्तीने स्मार्ट मीटर बसवले जात आहेत. याला तीव्र विरोध करणा-या ग्राहकांना आता महावितरणकडून थेट पत्रे पाठविण्यात येत असून मीटर बसविण्यास विरोध केल्यास आणि सहकार्य न केल्यास वीजपुरवठा खंडित करणे आणि शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याचा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे शहरातील अनेक ग्राहकांमध्ये नाराजी निर्माण झाली आहे. मुख्यमंत्र्याच्याच नगरीत असले प्रकार होत असतील, तर सामान्य जनता कोणाकडे न्याय मागतील हा गंभीर प्रश्न उदयास येतो.

नीट पेपरफुटी प्रकरण हे देशभरातील वैद्यकीय प्रवेश परीक्षांमध्ये झालेल्या गैरव्यवहाराशी संबंधित आहे, ज्यामध्ये महाराष्ट्रातील लातूर आणि देशभरात अनेक ठिकाणी सीबीआयची चौकशी सुरू आहे. या घोटाळ्यात काही कोचिंग क्लासेसचे संचालक आणि प्रश्नपत्रिका फोडणारे मुख्य सूत्रधार अटकेत आहेत. सीबीआयने लातूरमध्ये तात्पुरते कार्यालय थाटून तपासाची व्याप्ती वाढवली आहे. तपासात, रसायनशास्त्र विषयाचे मूळ प्रश्न ५ लाख रुपयांच्या मोबदल्यात फोडल्याचे उघड झाले आहे. आरसीसी कोचिंग क्लासेसचे संचालक शिवराज मोटेगावकर आणि पी. व्ही. कुलकर्णी यांच्यावर प्रश्नपत्रिका फोडल्याचा व लाखो रुपयांची माया गोळा केल्याचा गंभीर आरोप आहे. पेपरफुटीच्या वादामुळे २१ जून रोजी घेण्यात आलेल्या फेरपरीक्षेचा निकाल १६ जुलै रोजी जाहीर करण्यात आला. मात्र, प्रकरणातील मुख्य संशयित आरोपी यश यादव याच्या कामगिरीबाबतचा निकाल एनटीए ने राखून ठेवला आहे. या घोटाळ्यामुळे विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान झाल्याने देशभरात संतापाची लाट उसळली आहे. दिल्लीत जंतरमंतर येथे आणि महाराष्ट्रात नाशिकसह अनेक ठिकाणी याविरोधात निदर्शने सुरू आहेत.

महाराष्ट्रात शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) पेपरफुटीचे मोठे रॅकेट उघडकीस आले असून या प्रकरणात परीक्षा रद्द करण्यात आली आहे. उत्तर प्रदेशातील एका खाजगी प्रेसमध्ये छापलेला पेपर अवघ्या ८ हजारांत विकल्याचे आणि मुख्य सूत्रधार विजेंद्रकुमार गुप्ता याला प्रत्येक पेपरमागे ७० हजार रुपये कमवायचे असल्याचे उघड झाले. त्यानंतर विविध एजंटांनी त्यावर स्वतःचे कमिशन जोडत किंमत आणखी वाढवली. तब्बल सहा लाखांहून अधिक शिक्षक उमेदवारांचे भविष्य ठरवणारी प्रश्नपत्रिका कोणत्याही हॅकिंगने किंवा अत्याधुनिक तंत्रज्ञानाने नव्हे, तर एका साध्या बुटाच्या मदतीने छापखान्यातून बाहेर काढण्यात आली.

त्यासाठी मोबदला किती मिळाला, तर अवघे ८ हजार रुपये आणि भविष्यात एक प्लॉट देण्याचे आश्वासन. चक्क शाळेच्या वेळेतच मुख्याध्यापिका अत्यंत गाढझोपेत आढळून आल्याचा आरोप नेर तालुक्यातील खंडाळा ग्रामस्थांनी केला आहे. या प्रकरणी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सुधीर ढोके यांनी गटशिक्षणाधिका-याकडे लेखी तक्रार दिली. दरम्यान, संतप्त पालकांनी शाळेला कुलूप ठोकले असून संबंधित शिक्षिकेची तातडीने बदली करावी, अशी मागणी केली. शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षांचा मुलगा दुपारी शाळेतून अचानक घरी आला.


**सुनील शिरपुरे**
**कमळवेल्ली, यवतमाळ**
**sunilshirpure776@gmail.com**



# पान १ व ४ वरुन...


### लोकभावनेचा आदर ....

खेळ आहे. या गंभीर घटनांची नैतिक जबाबदारी संबंधित मंत्र्यांनी स्वीकारून तातडीने राजीनामे द्यावेत,'' अशी मागणी त्यांनी केली.

**लालबहादूर शास्त्रींचा आदर्श ठेवण्याचे आवाहन**

यावेळी त्यांनी देशाचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या कार्यपद्धतीचा उल्लेख करत सत्ताधाऱ्यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारण्याची परंपरा जपली पाहिजे, असे सांगितले.

''सत्तेवर टिकून राहण्यापेक्षा लोकशाही मूल्ये, नैतिकता आणि जबाबदारी अधिक महत्त्वाची असते. चुका झाल्यास जबाबदारी स्वीकारण्याची तयारी ही लोकप्रतिनिधींकडे असली पाहिजे,'' असे ते म्हणाले.

**मोर्चात विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती**

मोर्चात आनंदराज आंबेडकर यांच्यासह ॲड. अमन आंबेडकर, ॲड. सुरेश माने, संजय खामकर, परसराम इंगोले, जालना महापौर वंदना मगरे, ॲड. शिवाजीराव आदमाने, ॲड. ब्रम्हानंद चव्हाण, सुधाकर निकाळजे, विलास डोळसे, डॉ. सुशील सूर्यवंशी, महेंद्र रत्नपारखे, संदीप खरात, हरीश रत्नपारखे, ॲड. रिमा खरात, निखील पगारे, राहुल रत्नपारखे, जितू उघडे, मुरली बोबडे, भास्कर शिंदे, विनोद रत्नपारखे, सुनिल रत्नपारखे, अमोल रत्नपारखे, सुनिल साळवे, महेंद्र बनकर, राजेश सदावर्ते, अरुण वाघमारे, कुणाल दहीवाळ, कपील खरात यांच्यासह विविध आंबेडकरी संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

**प्रशासनाला निवेदन; शांततेत मोर्चा संपन्न**

जाहीर सभेनंतर आंदोलनकर्त्यांनी जिल्हा प्रशासनाला आपल्या मागण्यांचे निवेदन सादर केले. मोर्चादरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवला होता. वाहतुकीचे नियोजनही प्रभावीपणे करण्यात आले. त्यामुळे मोर्चा शांततेत आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सुशील सूर्यवंशी यांनी केले. सूत्रसंचालन प्रभाकर घेवंदे यांनी केले, तर आभार प्रदर्शन हरीश रत्नपारखे आणि राहुल रत्नपारखे यांनी केले. आंदोलनाच्या शेवटी उपस्थितांनी संविधान आणि आरक्षण संरक्षणाचा निर्धार व्यक्त करत आगामी काळातही संघर्ष अधिक तीव्र करण्याचा संकल्प केला.

### एल-निनोच्या...

व जलसंवर्धनाची कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी दिले. अभियानांतर्गत जलपंचायत व पाणी वापर संस्था () स्थापन करणे, प्रत्येक घर व शासकीय इमारतींवर रूफटॉप रेनवॉटर हार्वेस्टिंगची व्यवस्था उभारणे, प्रत्येक नगरपंचायत व नगरपालिकेत किमान २०० आणि महानगरपालिकेत किमान ५०० जलतारा व शोषखड्डे तयार करणे, लोकसहभागातून तलाव गाळमुक्त करणे, वनराई व अनकट दगडी बंधारे उभारणे, विहीर पुनर्भरण व भूमिगत बंधारे निर्माण करणे तसेच पिकांच्या पद्धतीत आवश्यक बदल करणे या सात प्रमुख उपक्रमांवर भर देण्यात येणार आहे. जलसंधारणाच्या कामांमध्ये प्रशासनासोबत लोकसहभाग अत्यंत महत्त्वाचा असून, प्रत्येक नागरिकाने पाणी बचत व जलसंवर्धनासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहनही श्रीमती मित्तल यांनी यावेळी केले. बैठकीस जालना महानगरपालिकेचे महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, सहाय्यक आयुक्त, नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, नगरसेवक, मुख्याधिकारी तसेच संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. उपजिल्हाधिकारी (रोहयो) मनीषा दांडगे, नगर प्रशासनाचे सहआयुक्त गवळी आणि नायब तहसीलदार डॉ. नीलम लुणावत यांचीही उपस्थिती होती. जिल्हाधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार पाणी अडवा, पाणी जिरवा अभियानाला तात्काळ सुरुवात करण्यात आली. जालना महानगरपालिकेचे उपमहापौर राजेश राऊत यांनी आपल्या शेतातील नैसर्गिक उताराच्या ठिकाणी जेसीबीच्या सहाय्याने १० बाय १० फूट आकाराचा जलसंधारण खड्डा खोदून अभियानाचा प्रारंभ केला. ''एकत्र येऊ, जल वाचवू; प्रशासन आणि समाजाच्या संयुक्त प्रयत्नातून जालना जिल्हा जलसुरक्षित बनवू,'' असा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

### श्री संत सावळी...

वानखेडे, निलेश वानखेडे, संदीप जैवळ, यांची निवड करण्यात आली. या बैठकीला बाबासाहेब वानखेडे यांच्यासह समाज बांधवांची उपस्थिती होती.

### शिक्षण क्षेत्रातील...

अपयशी ठरले असून, यामुळे देशातील शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास उडत चालला आहे.

सोनम वांगचुक यांच्या उपोषणाची दखल घ्या

विद्यार्थ्यांच्या याच न्याय्य हक्कांसाठी आणि शिक्षण क्षेत्रातील सुधारणांसाठी सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी शांततापूर्ण मार्गाने उपोषणाचे हत्यार उपसले आहे. केंद्र सरकारने त्यांच्या आंदोलनाची तातडीने दखल घेऊन विद्यार्थ्यांनी मांडलेल्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घ्यावा,अशी मागणी आंदोलकांनी केली आहे.देशातील शिक्षण व्यवस्थेत निर्माण झालेल्या या गोंधळाची आणि विद्यार्थ्यांच्या प्रश्नांची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षण मंत्री श्री. धर्मेंद्र प्रधान यांनी आपल्या पदाचा राजीनामा द्यावा, अथवा राष्ट्रपतींनी त्यांच्यावर योग्य ती संवैधानिक कारवाई करावी, अशी आग्रही मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.शिक्षण क्षेत्रात पारदर्शक आणि उत्तरदायी व्यवस्था निर्माण करून विद्यार्थ्यांच्या हिताचे रक्षण न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही यावेळी उपस्थित शिक्षणप्रेमी नागरिकांनी दिला आहे.

# प्रक्रियेस आणखी दोन महिन्यांची मुदतवाढ देण्याची फेडरेशन ऑफ महाराष्ट्र मुस्लिम्सची मागणी

**जालना । प्रतिनिधी**

महाराष्ट्रात सुरू असलेल्या विशेष सघन मतदार यादी पुनरावलोकन प्रक्रियेस केवळ ०८ ऑगस्ट २०२६ पर्यंत दिलेली मुदत अपुरी असल्याचे सांगत फेडरेशन ऑफ महाराष्ट्र मुस्लिम्स () च्या शिष्टमंडळाने भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त श्री. ज्ञानेश कुमार, महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी श्री. चोक्कलिंगम तसेच जालना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत सविस्तर निवेदन सादर केले. निवेदनात भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्रासाठी प्रक्रियेची मुदत ०८ ऑगस्टपर्यंत वाढविल्याबद्दल स्वागत करण्यात आले असून, सुमारे १२ कोटी लोकसंख्या असलेल्या महाराष्ट्रासाठी ही मुदत अद्यापही अपुरी असल्याचे नमूद करण्यात आले आहे.



फेडरेशनने निवेदनात म्हटले आहे की, सध्या राज्यातील लाखो शेतकरी खरीप हंगामातील पेरणीच्या कामात व्यस्त आहेत. तसेच मोठ्या संख्येने वारकरी आषाढी वारी व इतर धार्मिक कार्यक्रमांमध्ये सहभागी असल्याने अनेक नागरिक आपल्या मूळ गावी उपलब्ध नाहीत. अनेक भागांमध्ये - अद्याप पूर्ण झालेले नसून, तांत्रिक अडचणी आणि यांच्यावर असलेला अतिरिक्त कामाचा ताण यामुळे अनेक पात्र मतदार प्रक्रियेपासून वंचित राहण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे.

फेडरेशन ऑफ महाराष्ट्र मुस्लिम्सने निवडणूक आयोगाकडे प्रक्रियेस आणखी किमान दोन महिन्यांची मुदतवाढ, राज्यव्यापी व्यापक जनजागृती मोहीम, प्रत्येक अद्ययावत माहितीसाठी अधिकृत व्हिडिओ प्रसिद्ध करणे, मराठीसह स्थानिक भाषांमध्ये माहिती उपलब्ध करून देणे, ऑनलाइन व तांत्रिक अडचणी तातडीने दूर करणे, घराघरांत अर्ज वितरणाची प्रभावी अंमलबजावणी करणे तसेच शिक्षक, अंगणवाडी सेविका आणि यांच्यावरील अतिरिक्त कामाचा ताण कमी करण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ व सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे.

निवेदनात असेही नमूद करण्यात आले आहे की, महाराष्ट्रात सध्या कोणतीही तातडीची निवडणूक नसल्यामुळे प्रक्रियेस आणखी दोन महिन्यांची मुदतवाढ देण्यास कोणताही प्रशासकीय अडथळा नाही. त्यामुळे राज्यातील प्रत्यक्ष परिस्थितीचा विचार करून प्रत्येक पात्र मतदाराला प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी मिळावी, अशी मागणी करण्यात आली आहे. लोकशाही मूल्यांचे संरक्षण, मुक्त व निष्पक्ष निवडणूक प्रक्रिया आणि प्रत्येक पात्र नागरिकाच्या मतदानाच्या अधिकाराच्या रक्षणासाठी निवडणूक आयोगाने या सर्व मागण्यांचा सकारात्मक विचार करून तातडीने आवश्यक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा फेडरेशन ऑफ महाराष्ट्र मुस्लिम्सने व्यक्त केली.

निवेदन देताना उपस्थित: शेख मुजीब (कोऑर्डिनेटर, फेडरेशन ऑफ महाराष्ट्र मुस्लिम्स), हाफिज जुबैर फारुकी, मोहम्मद अता बख्शी (कन्व्हिनर), अहमद नूर , काजी सोहेल, वसीम शेख (सामाजिक कार्यकर्ते), सय्यद रहीम (माजी नगरसेवक व सामाजिक कार्यकर्ते), रियाज अन्सारी आणि जाजेब अहमद उपस्थित होते.

# मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेअंतर्गत कर्ज मंजुरीसाठी जास्तीत जास्त अर्ज करण्याचे आवाहन

**जालना - प्रतिनिधी**

राज्यातील शहरी व ग्रामीण क्षेत्रातील सुशिक्षित युवक-युवतींची वाढती संख्या व उद्योग व्यवसाय क्षेत्रात राज्यात विविध क्षेत्रात उपलब्ध होत असलेल्या स्वयंरोजगार व रोजगाराच्या नवीन संधी विचारात घेवून उद्योजकतेला चालना देणारी व सर्जनशिलतेला कालानुरूप वाव देणारी राज्याची महत्वाकांक्षी अशी सर्वसमावेशक योजना मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम सन २०१९-२० या आर्थिक वर्षापासून राज्यात कार्यान्वित आहे.

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेअंतर्गत जालना जिल्ह्यासाठी सन २०२६-२७ वर्षाकरिता दिलेल्या ७८० कर्ज मंजुरीच्या उददिष्टापैकी जिल्हा उद्योनग केंद्र या कार्यालयाचे ३४७ कर्ज प्रस्ताव बँकाकडे शिफारस करण्यात आले असुन, ७६ कर्ज प्रस्तावांना बँकांनी मंजूरी दिलेली आहे. तसेच जिल्हा खादी व ग्रामोद्योग मंडळ या कार्यालयाचे ९३ कर्ज प्रस्ताव बँकांकडे शिफारस करण्यात आलेले असुन १६ कर्ज प्रस्तावांना बँकानी मंजुरी दिलेली आहे. असे एकूण ९२ कर्ज प्रस्तावांना बँकांनी मंजुरी दिलेली आहे. सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरिता प्राप्त १३०० प्रकरणाचे उद्दिष्ट पूर्तीसाठी ग्रामीण व शहरी तरुणांनी जास्तीत-जास्त अर्ज योजनेच्या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने भरावे. (.-..) तसेच जिल्ह्यातील सर्व बँक व्यवस्थापक यांनी छाननी करून संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या कर्ज प्रस्तावांना त्वरित कर्ज मंजुरी देऊन उदिवष्ट पूर्तीसाठी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक योगेश सारणीकर यांनी केले आहे.

# बाटलीतला नव्हे... वास्तवातला गंगाराम

**दत्ता देशमुख**

चित्रपट आणि वास्तव यांच्यात खूप मोठे अंतर असते, असे आपण नेहमी म्हणतो. पण कधी-कधी एखाद्या चित्रपटातील एखादे पात्र प्रत्यक्ष आयुष्यात भेटलेल्या व्यक्तीची आठवण करून देते. प्रसिध्द अशा धडाकेबाज या चित्रपटात लक्ष्याला बाटलीत गंगाराम भेटतो. अगदी तसाच गंगाराम नावाचा माणूस मला बुलढाण्याच्या मलकापूरमध्ये भेटला होता. तेव्हा जाणवलं की, दोन्ही गंगाराम गुणांनी जवळपास सारखेच. पण हा गंगाराम पडद्यावरील काल्पनिक नव्हता. तर तो रक्तामांसाचा, संघर्षातून घडलेला आणि शिक्षण क्षेत्रातील सकारात्मक बदलासाठी झटणारा होता. साधेपणात मोठेपण शोधणारा, पदापेक्षा माणुसकीला अधिक महत्त्व देणारा आणि कोणत्याही व्यक्तीशी आत्मीयतेने वागणारा हा माणूस पहिल्याच भेटीत मनात घर करून गेला. कारण बाटलीतल्या गंगारामला समाजातील दुर्जनांना नष्ट करायचे होते, आणि मलकापूरच्या गंगारामला शैक्षणिक क्षेत्रातल्या चुकीच्या गोष्टी नष्ट करायच्या होत्या. आणखी एक बाब म्हणजे, बाटलीतला गंगाराम लक्ष्याला जसा आपुलकीने व आत्मीयतेने बोलायचा, अगदी तसाच अनुभव मला मलकापूरच्या त्या गंगारामचा आला होता. प्रभावी संवाद, समजून घेण्याची वृत्ती, कोणत्याही कामात पुढाकार, मदतशील स्वभाव आणि आपलेपणाची भावना या गुणांमुळे मलकापूरच्या गंगारामचा आणि माझा स्नेह वाढला. भेटीगाठी आणि संवाद सुध्दा वाढतच गेला. अगदी आजतागायत. काही वर्षांपूर्वी एका शैक्षणिक उपक्रमात काम करत होतो. त्यामुळे कामाचा भाग म्हणून चार दिवसीय तालुकास्तरीय प्रशिक्षणासाठी बुलढाण्याच्या मलकापूरात गेलो होतो. सोबतीला हरहुन्नरी तथा बहुआयामी मार्गदर्शक मित्र बाळासाहेब ठोंबरे होते. विशेष म्हणजे आम्ही दोघे आणि गंगाराम असे तिघेही मराठवाड्यातले. त्यामुळे त्या प्रशिक्षणादरम्यान आमच्यातला संवाद अधिकच खुलला. आपुलकी, प्रेम आणि जिव्हाळा दृढ झाला. परिणामी, प्रशिक्षणापूर्वी सकाळी चहा, नाश्ता सोबत. दुपारी भोजन सुध्दा मिळूनच, आणि प्रशिक्षण सुटल्यावर सायंकाळी चहापाणी एकत्रच, असा आमचा दिनक्रम ठरलेला होता. त्यामुळे गंगाराम यांच्याकडून अनेक बारकावे आणि पडद्यामागील व्यवस्था समजून घेता आली. शिवाय, शैक्षणिक क्षेत्रातील उणीवांचा सखोल आढावा घेता येईल. व्यवस्थेपुढे शहाणपण टिकत नाही, ही मराठी म्हण कशी प्रचिलीत झाली, याचीही रंजक काहाणी गंगाराम यांनी आवर्जून सांगितले. तसेच व्यवस्थेत सगळे मुकादम असतात, अर्थात वरच्याचा मुका घ्यायचा आणि खालच्याला दम द्यायचा, असंही गंगाराम यांनीच नमूद केल्याचे आठवत आहे. त्या चार दिवसीय प्रशिक्षणादरम्यान मित्रवर्य बाळासाहेब ठोंबरे यांच्या आवाजातील एक से बढकर एक गीतांचे अर्थात गाण्यांचे गंगाराम अगदी फॅन झाले होते. त्यामुळे मलकापूर ते बुलढाणा आणि बुलढाणा ते मलकापूर या प्रवासादरम्यान लालपरीत अर्थात एसटीमध्ये सुध्दा बाळासाहेबांनी गायलेली गाणी आजही जशीच्या तशी आठवत आहेत. म्हणूनच मित्रवर्य बाळासाहेब ठोंबरे नावाच्या व्यक्तीचा आजही आणि पुढेही कायम आदर करत आलो आहे. असो,

...तर गंगाराम आल्हाट हे त्यांचं नाव, आणि जालन्याच्या भोकरदन तालुक्यातील मौजे.पारध बुद्रक शाहूराजा हे त्यांचं गाव. गावखेड्यातल्या मध्यमवर्गीय गंगारामाच्या वाट्याला पारंपारिक समस्या आणि अडचणी आल्या. लहानपणापासूनच गरीबीशी दोन हात करून त्यांनी आपल्या शैक्षणिक प्रगतीचा आलेख उंचावला. उमेदीच्या काळात शिक्षण खात्यात गटसाधन व्यक्ती म्हणून नोकरी लागली. सुरूवातील आपल्याचा तालुक्यात सेवा केली. पुढे जालना जिल्ह्यातल्या जाफराबाद तालुक्याला बदली झाली. तिथेही त्यांनी इमानेइतबारे सेवा केली. शिक्षण खात्याला शिस्त लावण्यासाठी आपल्या स्वतःच्या क्षमतेनुसार प्रयत्न केले. पुढे अचानक त्यांची बदली थेट खानदेशात अर्थात जळगावच्या चोपडा तालुक्यात झाली. तेथेही पडेल ती जबाबदारी त्यांनी प्रामाणिकपणे पार पाडली. त्यानंतर नोकरीच्या निमित्ताने ते विदर्भात अर्थात बुलढाणा जिल्ह्यात आले. त्यानंतर त्यांच्यावर गटशिक्षणाधिकारी कार्यालय, मलकापूर येथे गटसाधन व्यक्ती म्हणून जबाबदारी देण्यात आली. त्यामुळे त्यांनी विविध शैक्षणिक प्रकल्पाची योग्य अंमलबजावणी केली. मुलांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी मेहनत घेतली. नोकरीच्या कार्यकक्षेबाहेर जात अनेक उपक्रमांना पाठबळ दिले. वेगवेगळ्या सामाजिक संस्थांचे शैक्षणिक प्रकल्प योग्य पध्दतीने राबविले जावेत, यासाठी पुढाकार घेतला. अधिकारी आणि शिक्षक यांच्यात समन्वय निर्माण करून भरीव योगदान दिले.

काही भेटी योगायोगाने घडतात. पण त्या पुढे आयुष्यभर जपाव्याशा वाटतात. मलकापूर येथे झालेली आमची भेटही अशीच होती. कामाच्या निमित्ताने झालेली ती भेट पुढे स्नेहाच्या नात्यात



बदलली, याची त्यावेळी कल्पनाही नव्हती. मित्रवर्य बाळासाहेब ठोंबरे, मी आणि गंगाराम आल्हाट आम्ही तिघेही मराठवाड्यातलेच. त्यामुळे एकाच मातीत वाढलेली माणसे भेटली की, संवादासाठी वेगळ्या परिचयाची गरज भासत नाही. काही क्षणांतच आम्ही एकमेकांचे झालो. प्रशिक्षणाचा पहिलाच दिवस संपला आणि गप्पांचा ओघ सुरू झाला. शिक्षण, समाज, प्रशासन, ग्रामीण जीवन, शिक्षकांच्या अडचणी, विद्यार्थ्यांचे भविष्य अशा अनेक विषयांवर चर्चा रंगू लागली. गंगाराम यांचे प्रत्येक वाक्य अनुभवातून आलेले असल्यामुळे त्यात कृत्रिमपणा नव्हता, तर वास्तवाचा ठसा होता. त्यांच्या बोलण्यात मोठेपणाचा आव नव्हता. समोरच्या माणसाला समजून घेण्याची वृत्ती होती. त्यामुळे त्यांच्या सहवासात असताना कधीही औपचारिकपणा जाणवत नव्हता. जणू अनेक वर्षांचा परिचय असल्यासारखे वातावरण पहिल्याच दिवशी निर्माण झाले.

प्रशिक्षणाच्या चार दिवसांत आमचा एक सुंदर दिनक्रम तयार झाला. सकाळचा चहा, नाश्ता, दुपारचे भोजन, संध्याकाळचे चहापाणी आणि रात्री उशिरापर्यंत रंगणाऱ्या गप्पा... या सर्व क्षणांनी मैत्रीची वीण अधिक घट्ट केली. आज अनेक वर्षांनंतरही त्या क्षणांची ऊब तशीच जाणवते. एखाद्या व्यक्तीला ओळखायचे असेल, तर त्याच्यासोबत काही वेळ घालवावा लागतो. गंगाराम यांच्या सहवासात राहिल्यानंतर त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील अनेक पैलू उलगडत गेले. ते केवळ अधिकारी अर्थात गटसाधन व्यक्ती नव्हते, तर ते संवेदनशील शिक्षक, अभ्यासू मार्गदर्शक आणि माणसांना जोडणारे व्यक्तिमत्त्व होते. शिक्षण क्षेत्रातील अनेक पडद्यामागील बाबी त्यांनी अतिशय मोकळेपणाने सांगितल्या.

विशेष म्हणजे आमच्यात संवाद होत असताना त्यांनी व्यवस्थेतील अडथळे लपवण्याचा प्रयत्न कधीही केला नाही. उलट त्या अडचणी दूर करण्यासाठी काय करता येईल? याचाच विचार ते सातत्याने करत असल्याचे जाणवत राहिले. व्यवस्थेपुढे शहाणपण टिकत नाही, ही प्रचलित म्हण त्यांनी ज्या संदर्भाने सांगितली, ती आजही मनात कोरली आहे. व्यवस्थेतील विसंगतीवर त्यांनी केलेले भाष्य हे केवळ टीका नव्हते. तर सुधारणा व्हावी, अशी प्रामाणिक तळमळ त्यामागे होती. शिवाय व्यवस्थेत सगळे मुकादम असतात. वरच्याचा मुका घ्यायचा आणि खालच्याला दम द्यायचा, असेही ते मिश्कीलपणे म्हणाले होते. त्या एका वाक्यात त्यांनी अनेक वर्षांच्या अनुभवाचा सारांश मांडला होता. विनोदाच्या आडून वास्तव मांडण्याची त्यांची शैली विलक्षण होती.

प्रशिक्षणातील अभ्यासाइतक्याच आठवणी त्या प्रवासातील आहेत. मलकापूर ते बुलढाणा आणि बुलढाणा ते मलकापूर या एसटी प्रवासात मित्र बाळासाहेब ठोंबरे यांनी गायलेल्या सुरेल गीतांनी वातावरण भारावून जात असे. गंगाराम त्या गीतांचे अक्षरशः चाहते झाले होते. गाणे संपल्यानंतर त्यांच्या चेहऱ्यावर उमटणारे समाधान आजही डोळ्यांसमोर उभे राहते. मैत्रीची खरी ओळख मोठ्या समारंभात होत नाही, तर ती अशा छोट्या प्रवासांत, चहाच्या कपाजवळ आणि मनमोकळ्या संवादांत होत असते. गंगाराम आल्हाट यांच्याशी जुळलेला हा स्नेह अशाच असंख्य साध्या क्षणांतून अधिक समृद्ध होत गेला. काळ पुढे सरकत गेला. प्रशिक्षण संपले. दरम्यान माझे काम आणि ठिकाण दोन्ही बदलले. शिवाय प्रत्येक जण आपापल्या कामात व्यस्त झाला. पण काही नाती वेळ आणि अंतर यांच्यावर अवलंबून नसतात. गंगाराम यांच्याशी असलेला संवाद आजही तेवढ्याच आत्मीयतेने सुरू आहे. वर्षे बदलली, ठिकाणे बदलली, जबाबदाऱ्या बदलल्या. पण मैत्रीचा धागा मात्र तसाच मजबूत राहिला. तसंही प्रत्येक मोठ्या व्यक्तिमत्त्वामागे संघर्षाची एक शांत कहाणी दडलेली असते. बाहेरून दिसणाऱ्या यशामागे कितीतरी अपयश, कितीतरी त्याग आणि कितीतरी न बोललेले अश्रू दडलेले असतात. गंगाराम आल्हाट यांचाही प्रवास याला अपवाद नाही. त्यांच्या आयुष्याचा मागोवा घेतला की, संघर्षानेच त्यांना घडविले आणि संस्कारांनी त्यांना मोठे केले, हे प्रकर्षाने जाणवते. जालना जिल्ह्यातील भोकरदन तालुक्यातील पारध बुद्रक शाहूराजा हे त्यांचे जन्मगाव. ग्रामीण महाराष्ट्रातील इतर गावांप्रमाणेच या गावालाही अनेक समस्या होत्या. शेतीवर अवलंबून असलेले जीवन, मर्यादित साधने आणि मोठी स्वप्ने अशा वातावरणात गंगाराम यांचे बालपण आकार घेत गेले. गरीबी ही त्यांच्या आयुष्याची कायमची सोबती होती. पण तिने त्यांच्या स्वप्नांवर कधीच सावली पडू दिली नाही. परिस्थितीशी झुंज देताना त्यांनी शिक्षणालाच आपले सर्वात मोठे शस्त्र मानले. कारण त्यांना माहीत होते की, माणसाच्या आयुष्यातील खरी क्रांती पुस्तकांच्या पानांतूनच सुरू होते. गावाकडच्या मुलाला शिक्षणासाठी किती संघर्ष करावा लागतो, याचा अनुभव त्यांनी जवळून घेतला. म्हणूनच पुढे शिक्षण विभागात काम करताना त्यांना प्रत्येक ग्रामीण विद्यार्थ्याच्या वेदना सहज समजल्या. कागदावरील आकडे आणि प्रत्यक्षातील वास्तव यांतील फरक त्यांनी स्वतः अनुभवला होता. त्यामुळे नोकरी मिळणे हा त्यांच्या आयुष्यातील शेवटचा टप्पा नव्हता. तर तो नव्या जबाबदारीचा आरंभ होता. गटसाधन व्यक्ती म्हणून जबाबदारी स्वीकारल्यानंतर त्यांनी स्वतःला एका कार्यालयापुरते मर्यादित ठेवले नाही. त्यांनी शिक्षणाला समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम मानले. सेवेच्या सुरुवातीच्या काळात त्यांनी आपल्या परिसरात काम करताना शिक्षकांशी विश्वासाचे नाते निर्माण केले. नियमांचे पालन आवश्यक आहे, पण त्यामागील मानवी बाजूही तेवढीच महत्त्वाची आहे, हा दृष्टिकोन त्यांच्या प्रत्येक कृतीत दिसत असे. जाफराबाद येथे बदली झाल्यानंतर नवीन वातावरणात अनेक आव्हाने होती. नवीन माणसे, नवीन कार्यपद्धती आणि नवीन अपेक्षा यांच्यात त्यांनी स्वतःला सहज मिसळून घेतले. कोणतीही जागा आपली करण्यासाठी पदापेक्षा स्वभाव अधिक महत्त्वाचा असतो, हे त्यांनी सिद्ध केले. यांच्यातील एक महत्त्वाचा गुण म्हणजे निरीक्षणशक्ती. एखादी समस्या समोर आली की, तिचे वरवरचे स्वरूप न पाहता ती नेमकी का निर्माण झाली, याचा ते शांतपणे विचार करतात. त्यामुळे त्यांच्या सूचना नेहमी व्यवहार्य आणि परिणामकारक ठरतात. तसंही शिक्षण विभागात अनेक योजना येतात, अनेक आदेश निघतात आणि अनेक उपक्रम राबविले जातात. पण एखाद्या योजनेचे खरे यश तिच्या अंमलबजावणीवर अवलंबून असते. ही बाब गंगाराम यांनी नेहमी लक्षात ठेवली. म्हणूनच त्यांनी प्रत्येक उपक्रमाकडे केवळ प्रशासकीय काम म्हणून नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी जोडलेली जबाबदारी म्हणून पाहिले.

जळगाव जिल्ह्यातील चोपडा तालुक्यात सेवा करतानाही त्यांनी हाच दृष्टिकोन कायम ठेवला. प्रदेश बदलला, भाषा थोडी बदलली, माणसे बदलली. पण त्यांच्या कामाची तळमळ बदलली नाही. प्रत्येक ठिकाणी त्यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. विदर्भातील बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर येथे त्यांनी काम सुरू केले, तेव्हा अनेकांना एक अभ्यासू, समन्वयक आणि कामात झोकून देणारा अधिकारी लाभला. अनेक शैक्षणिक प्रकल्पांच्या यशस्वी अंमलबजावणीत त्यांचा मोलाचा वाटा राहिला. त्यांनी प्रत्येक कामाकडे कर्तव्य म्हणून नव्हे, तर ध्येय म्हणून पाहिले. गंगाराम यांच्या कार्यपद्धतीतील आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे समन्वय. अधिकारी आणि शिक्षक यांच्यामध्ये अनेकदा निर्माण होणारे संवादाचे अंतर कमी करण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. परस्पर विश्वासाशिवाय शिक्षण व्यवस्था सक्षम होऊ शकत नाही, हा त्यांचा ठाम विश्वास होता. शिक्षकांना आदेश देणे सोपे असते. पण त्यांना प्रेरणा देणे कठीण असते. गंगाराम यांनी ही दुसरी वाट निवडली. शिक्षकांच्या अडचणी समजून घेत त्यांना सकारात्मक मार्गदर्शन करणे, हा त्यांच्या कामाचा अविभाज्य भाग बनला. नोकरीच्या चौकटीबाहेरही त्यांची धडपड सुरूच राहिली. विविध सामाजिक संस्थांनी राबविलेल्या शैक्षणिक उपक्रमांना त्यांनी आवश्यक ते मार्गदर्शन केले. समाजातील प्रत्येक मुलापर्यंत गुणवत्तापूर्ण शिक्षण पोहोचावे, हीच त्यामागील त्यांची खरी प्रेरणा होती. आज त्यांच्या प्रवासाकडे मागे वळून पाहताना एक गोष्ट स्पष्टपणे जाणवते की, त्यांनी पदाला प्रतिष्ठा मिळवून दिली. कारण काही लोक पदामुळे मोठे होतात. पण काही लोक आपल्या कार्यामुळे त्या पदालाच मोठेपण प्राप्त करून देतात. गंगाराम आल्हाट हे निःसंशयपणे त्या दुसऱ्या प्रकारातील व्यक्तिमत्त्व आहे. एखाद्या व्यक्तीची खरी ओळख त्याच्या पदावरून होत नाही. ती त्याच्या अनुपस्थितीत लोक त्याच्याविषयी काय बोलतात, यावरून होते. गंगाराम आल्हाट यांच्याविषयी बोलताना त्यांच्या पदाचा उल्लेख नंतर येतो. आधी आठवतो तो त्यांचा साधेपणा, त्यांची आपुलकी आणि प्रत्येकाला आपलेसे करून घेण्याची विलक्षण ताकद. म्हणूनच त्यांच्या सहवासात आलेली माणसे त्यांना अधिकारी म्हणून नव्हे, तर जिवाभावाचा माणूस म्हणून लक्षात ठेवतात. त्यांच्या आयुष्याकडे पाहताना एक गोष्ट स्पष्ट जाणवते की, त्यांनी कधीही यशाचा गाजावाजा केला नाही. आपल्या वाट्याला आलेले काम प्रामाणिकपणे करायचे, समाजासाठी शक्य तेवढे योगदान द्यायचे आणि पुढील पिढी अधिक सक्षम व्हावी यासाठी सातत्याने प्रयत्न करायचे, एवढेच त्यांचे जीवनसूत्र राहिले आहे. पण आजच्या स्पर्धेच्या आणि प्रसिद्धीच्या युगात अशी वृत्ती दुर्मीळ होत चालली आहे. शिक्षण ही केवळ नोकरीची बाब नाही, तर समाजनिर्मितीची प्रक्रिया आहे, यावर त्यांचा दृढ विश्वास आहे. त्यामुळे शाळा, शिक्षक आणि विद्यार्थी या तिन्ही घटकांकडे त्यांनी केवळ प्रशासकीय दृष्टीने पाहिले नाही, तर सामाजिक जबाबदारी म्हणून त्यांचा विचार केला. प्रत्येक विद्यार्थ्याच्या प्रगतीतच राष्ट्राच्या प्रगतीचे बीज दडलेले आहे, ही जाणीव त्यांच्या कार्यातून सातत्याने दिसून येते. शिवाय माणसांशी नातं जोडण्यासाठी मोठ्या पदाची गरज नसते. तर त्यासाठी मोठ्या मनाची गरज असते. गंगाराम यांच्याकडे हे मोठेपण विपुल प्रमाणात आहे. कोणत्याही व्यक्तीशी बोलताना ते समोरच्या माणसाला पूर्ण वेळ देतात, त्याचे म्हणणे संयमाने ऐकतात आणि शक्य असेल तेथे मदतीचा हात पुढे करतात. त्यामुळे त्यांच्याशी एकदा परिचय झाला की, तो दीर्घकाळ टिकून राहतो. मलकापूरच्या त्या चार दिवसांच्या सहवासाची आठवण आजही मनात ताजी आहे. चहाच्या कपाभोवती रंगलेल्या चर्चा, शिक्षण व्यवस्थेवर झालेली चिंतनशील मांडणी, बाळासाहेब ठोंबरे यांच्या गीतांनी भारावलेले क्षण आणि त्यामधून अधिक दृढ होत गेलेली मैत्री हे सारे आजही स्मरणात तेवढ्याच जिवंतपणे उभे राहते. काळ पुढे सरकला, ठिकाणे बदलली. पण त्या आठवणींचा सुगंध अजूनही तसाच आहे. शिवाय गंगाराम आल्हाट यांच्या व्यक्तिमत्त्वात एक विलक्षण संतुलन दिसते. कामात शिस्त आहे, पण कठोरपणा नाही. विचारांत स्पष्टता आहे, पण अहंकार नाही. स्वभावात विनोद आहे, पण हलकेपणा नाही. आणि नात्यांत आत्मीयता आहे, पण दिखाऊपणा नाही. या संतुलित स्वभावामुळेच ते प्रत्येक ठिकाणी विश्वासार्ह व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात. तसेच कुटुंबाबद्दल त्यांची असलेली बांधिलकीही तितकीच प्रेरणादायी आहे. नोकरीच्या निमित्ताने अनेक ठिकाणी राहावे लागले, तरी घराशी असलेली नाळ त्यांनी कधीही तुटू दिली नाही. आपल्या मुलींच्या शिक्षणाकडे त्यांनी विशेष लक्ष दिले. मुलींच्या यशातच वडिलांचे खरे समाधान असते, ही भावना त्यांच्या प्रत्येक कृतीतून जाणवते.

आज समाजाला अशा व्यक्तींची गरज आहे, ज्या पदापेक्षा कर्तव्याला मोठे मानतात, अधिकारापेक्षा जबाबदारीला प्राधान्य देतात आणि प्रसिद्धीपेक्षा परिणामावर विश्वास ठेवतात. गंगाराम आल्हाट यांचे आयुष्य हा याच विचारांचा प्रवास आहे. संघर्षातून उभे राहूनही नम्रता न सोडणारा माणूस किती उंच जाऊ शकतो, याचे ते सुंदर उदाहरण आहेत. त्यामुळे माझ्यासाठी गंगाराम आल्हाट हे केवळ मित्र नाहीत, तर ते विचारांची देवाणघेवाण करणारे सहप्रवासी आहेत. गरज पडली की मार्गदर्शन करणारे ज्येष्ठ आहेत. आनंदाच्या क्षणी मनापासून हसणारे आणि अडचणीच्या वेळी धीर देणारे स्नेही आहेत. अशा व्यक्ती आयुष्यात वारंवार भेटत नाहीत. पण जेव्हा केव्हा त्या भेटतात आणि तेव्हा त्या व्यक्ती आपलं आयुष्य समृद्ध करून जातात. ...तर या अवलिया माणसांचा अर्थात सध्या जाफराबाद येथे गटसाधन व्यक्ती म्हणून कार्यरत असलेल्या गंगाराम आल्हाट यांचा आज वाढदिवस आहे. यानिमित्ताने त्या पहिल्या भेटीच्या प्रत्येक आठवणी नव्याने जाग्या होत आहेत. आयुष्यात भेटणारी प्रत्येक व्यक्ती काही ना काही शिकवून जाते. म्हणूनच त्यांना उत्तम आरोग्य आणि दीर्घायुष्य लाभो. तसेच त्यांची सगळी स्वप्ने, इच्छा आणि आकांक्षा पूर्ण होवोत. शिवाय, त्यांच्या आयुष्यात आनंद, समाधान आणि यशाची नवी क्षितिजे खुली होत राहावीत. त्यांच्या चेहऱ्यावरचे स्मित असेच कायम राहो आणि त्यांनी जपलेली माणुसकीची श्रीमंती अधिकाधिक लोकांच्या आयुष्यात प्रकाश पेरत राहो, याच सदिच्छेहस वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा!

# छायाचित्र प्रदर्शनातून उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जीवनप्रवासाचे दर्शन - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई - प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्यावर आधारित छायाचित्र प्रदर्शनाच्या माध्यमातून दादांचा संपूर्ण जीवनप्रवास सुंदरपणे उलगडला गेला आहे. त्यांच्या कार्यकर्तृत्वाची आणि अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाची झलक यातून पाहायला मिळते. या छायाचित्र प्रदर्शनातून त्यांच्या संपूर्ण जीवनपटाचे दर्शन होत असून आपल्या सर्वांच्या मनात त्यांच्या स्मृती कायम राहतील अशी भावना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली.



उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या ६७ व्या जयंतीचे औचित्य साधून महिला आर्थिक विकास महामंडळाच्या सभागृहात त्यांच्या जीवनप्रवासावर आधारित 'अजित स्मृती अविट स्मृती' या विशेष छायाचित्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या प्रदर्शनाचे आज उद्घाटन झाले. प्रदर्शनाचे उद्घाटन केल्यानंतर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अजित दादांच्या आठवणींना उजाळा दिला. उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. या प्रदर्शनामुळे दादांच्या आठवणी पुन्हा एकदा ताज्या झाल्या आहेत. अजितदादांवर प्रेम करणाऱ्या आणि त्यांना मानणाऱ्या प्रत्येकाने हे छायाचित्र प्रदर्शन आवर्जून पाहावे, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केले. आमदार शिवाजीराव गर्जे, सतीश चव्हाण, चंद्रदीप नरके, गोकुळ शिंदे, हिरामण खोसकर, माजी आमदार राजेश पाटील, गोकुळ संघाचे माजी चेअरमन अरुण डोंगरे यांच्यासह लोकप्रतिनिधी आणि मान्यवर यावेळी उपस्थित होते.



श्री संत ज्ञानेश्वर महाराज माऊली पालखी सोहळा आळंदी ते पंढरपूर पायी वारी आज माळशिरस येथे पोहचली असता माऊलींच्या रथा सोबत जालना चे वारकरी सहभागी झाले त्या मध्ये नगरसेवक श्रीकांत पांगारकर प्रेस फोटोग्राफर अनिल व्यवहारे, रामेश्वर गडगिळे, वासुदेव देवडे, अरुण गाढे,श्रीकांत देवडे,सौ शिला व्यवहारे,सौ माया गडगिळे,सौ संध्या मिसाळ, सौ रंजना मिसाळ,सौ अरुणा जाधव सौ निता देवडे सौ उर्मिला पांगारकर, सौ शीला ईघारे व सौ मनीषा गुंटुक इतर वारकरी छायाचित्रात दिसत आहे छाया.- *अतुल व्यवहारे*



जुना जालना भागातील गवळी मोहल्ला येथे एका घराला अचानक आग लागली व लाखो रुपयांचे नुकसान झाले. ***छायाचित्र किरण खानापुरे***

# सरकारी अधिकाऱ्यांच्या मनमानीला चाबूक; रद्द केलेल्या प्रकल्पांचे नुकसान आता थेट अधिकाऱ्यांच्या पगारातून वसूल होणार!

**जालना - प्रतिनिधी**

सरकारी अधिकारी किंवा स्थानिक प्रशासकीय यंत्रणांच्या मनमानी कारभारामुळे आणि अचानक घेतलेल्या निर्णयामांमुळे सुरु असलेले विकास प्रकल्प मध्यंतरी रोखणे किंवा रद्द करणे आता अधिकाऱ्यांना महागात पडणार आहे. अशा बेकायदेशीर स्थगितीमुळे किंवा रद्द केलेल्या प्रकल्पांमुळे कंत्राटदारांचे होणारे अथांग आर्थिक नुकसान यापुढे सर्वसामान्यांच्या करदात्यांच्या पैशातून भरले जाणार नाही, तर संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांच्या वैयक्तिक पगाराच्या खात्यातून वसूल केले जाईल, असा ऐतिहासिक आणि अत्यंत कठोर इशारा मुंबई उच्च न्यायालयाने दिला आहे.

मुंबई उच्च न्यायालयाचे प्रभारी मुख्य न्यायमूर्ती रवींद्र व्ही. घुगे आणि न्यायमूर्ती गौतम ए. अंखाड यांच्या खंडपीठाने /. विरुद्ध बृहन्मुंबई महानगरपालिका (रिट याचिका क्र. ३१५५/२०२६) या प्रकरणात हा ऐतिहासिक आदेश दिला आहे. या प्रकरणात कंत्राटदाराला वर्क ऑर्डर मिळाल्यानंतर आणि पायाभरणीचे काम पूर्ण झाल्यावरही महापालिका व राज्य शासनाच्या वादात प्रकल्प थांबवण्यात आला होता. यावर कंत्राटदाराने लवाद () प्रक्रियेद्वारे भरपाई मागितली असता उच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या मनमानीमुळे होणाऱ्या नुकसानाची भरपाई करदात्यांच्या पैशातून देणे हा जनतेवर अन्याय आहे. त्यामुळे अशा अधिकाऱ्यांनाच आता वैयक्तिकरीत्या जबाबदार धरून त्यांच्या वेतनातून रक्कम वसूल करण्याची वेळ आली आहे.

या महत्त्वपूर्ण निर्णयाचे स्वागत करताना जालन्यातील ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. महेश धन्नावत यांनी प्रशासकीय पारदर्शकतेवर प्रकाश टाकला. ॲड. महेश धन्नावत म्हणाले, ''उच्च न्यायालयाचा हा निर्णय म्हणजे लालफितीचा कारभार आणि प्रशासकीय हुकूमशाहीला बसलेला मोठा चाबूक आहे. आजवर राजकीय दबाव किंवा अधिकाऱ्यांच्या वैयक्तिक इच्छेमुळे चालू असलेले अनेक सार्वजनिक व खाजगी प्रकल्प अचानक थांबवले जात असत, ज्यामुळे कंत्राटदार आणि बिल्डर्सची कोट्यवधी रुपयांची भांडवली गुंतवणूक अडकून पडत असे. आता स्वतःच्या खिशातून पैसे जाण्याची टांगती तलवार असल्याने कोणताही अधिकारी बेकायदेशीर स्टॉप-वर्क नोटीस देण्यापूर्वी शंभर वेळा विचार करेल. हा निर्णय जालन्यातील बांधकाम व्यावसायिक आणि क्रेडाई च्या सदस्यांसाठी अत्यंत संजीवनी देणारा ठरणार आहे. जालन्यासारख्या वेगाने विकसित होणाऱ्या शहरात नगर परिषद किंवा महानगरपालिका प्रशासनाकडून अनेकदा लेआऊट मंजुरी, प्लॅन मंजुरी किंवा रस्ते व नागरी सुविधांच्या विकासकामांवर अचानक स्थगिती दिली जात असे. यामुळे बिल्डर्सचा बँकांकडून घेतलेल्या कर्जाचा व्याजदराचा बोजा वाढायचा आणि कामगार व साहित्याचा खर्च वाया जायचा. उच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे जालन्यातील बिल्डर्सना मोठा कायदेशीर आधार मिळाला असून, विनाकारण देण्यात येणाऱ्या स्टॉप-वर्क नोटिसांना कायमचा पायबंद बसणार आहे.याशिवाय, पब्लिक-प्रायव्हेट पार्टनरशिप आणि टाऊन प्लॅनिंग अंतर्गत चालणाऱ्या गृहप्रकल्पांना यामुळे मोठा दिलासा मिळेल. जालन्यातील बांधकाम व्यावसायिकांचे अवाजवी आर्थिक नुकसान टळल्यामुळे गृहप्रकल्प वेळेत पूर्ण होऊन सर्वसामान्य घरखरेदीदारांना देखील वेळेत घराचा ताबा मिळणे सोपे होईल. थोडक्यात सांगायचे तर, या निर्णयामुळे जालन्यातील रिअल इस्टेट क्षेत्राला प्रशासकीय त्रासापासून संरक्षण मिळाले असून, स्थानिक प्रशासनाला अधिक जबाबदार आणि पारदर्शक पद्धतीने काम करणे भाग पडणार आहे.

# मजूर मागासवर्गीय सहकारी संस्थांची २६ जुलैला बैठक

सुरेश रत्नपारखे यांचे उपस्थित राहण्याचे आवाहन

**जालना - प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यातील मजूर मागासवर्गीय सहकारी संस्थांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी जिल्ह्यातील सर्व मजूर संस्थांचे चेअरमन व सचिवांची एक महत्त्वाची बैठक रविवार, २६ जुलै रोजी दुपारी १२:३० वाजता शासकीय विश्रामगृह, जालना येथे आयोजित करण्यात आली आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागातील मागासवर्गीय मजूर सहकारी संस्थांचे ३०५४ हेडचे उर्वरित देयक (बिल) बऱ्याच काळापासून थकीत आहे. याशिवाय, मागासवर्गीय संस्थांना नवीन कामे मिळण्यातही अनेक अडचणी येत आहेत. या पार्श्वभूमीवर, संस्थांना त्वरित कामे उपलब्ध करून देणे, थकीत देयके तात्काळ अदा करणे आणि इतर विविध महत्त्वाच्या मागण्या शासनाकडे लावून धरण्यासाठी ही बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीमध्ये जिल्ह्यातील सर्व मागासवर्गीय मजूर संस्थांच्या पुढील आंदोलनाची आणि निवेदनांची दिशा ठरवण्यात येणार आहे. तरी जिल्ह्यातील सर्व मागासवर्गीय मजूर सहकारी संस्थांच्या चेअरमन व सचिवांनी वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन सुरेश रत्नपारखे यांनी केले आहे.

# मुलींसाठी मानव विकास ची बस सेवा.......

## मग मुलांसाठी का नाही : ग्रामीण भागातील अनेक मुलांना पायपीट करून गाठावी लागते शाळा

**दत्ता देशमुख**

टेंभुर्णी- ग्रामीण भागातील सर्व मुलांना शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध व्हाव्यात म्हणून शासन अनेक उपक्रम राबवीत आहे. त्याचाच एक भाग म्हणून मागील काही वर्षापासून ग्रामीण भागातून हायस्कूलला शिक्षणासाठी जाणाऱ्या मुलींसाठी मानव विकास मोफत बस सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. यामुळे अनेक मुलींचा शिक्षणाचा प्रश्न मिटला आहे. मात्र याच मुलींसोबत गावातून शिक्षणासाठी जाणाऱ्या मुलांसाठी ही बस सेवा उपलब्ध नसल्याने अनेक मुलांना आजही शिक्षणासाठी पायपीट करावी लागते. दरम्यान मुलीप्रमाणे मुलांसाठीही मानव विकास बस सेवा सुरू करण्यात यावी अशी मागणी ग्रामीण भागातील पालकातून होत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थी मोठ्या संख्येने जवळच्या मोठ्या गावात शिक्षणासाठी दररोज ये जा करीत असतात. यात मुलींच्या संख्ये एवढीच संख्या मुलांची आहे. मात्र मुलांना ही विशेष बस सेवा नसल्याने त्यांना शिक्षणासाठी आजही पायपीट करावी लागत आहे. अनेक गावात बस येत नसल्याने बससाठी असलेल्या जवळच्या फाट्यावर जाण्यासाठीही या मुलांना ३ ते ५ किलोमीटरचे अंतर पायी कापावे लागते. याशिवाय वेळेवर बस मिळाली नाही तर अनेकांना शाळेत जाण्यास उशीर होतो तर काहींची त्या दिवशीची शाळा ही बुडते. यासाठी मुलींप्रमाणे मुलांसाठीही मानव विकास अंतर्गत विशेष बस सेवा सुरू करणे नितांत गरजेचे आहे. चौकट- मुलींसाठी आमच्या गावातून मानव विकास व सेवा उपलब्ध असल्याने त्यांचा शाळेत येण्या जाण्याचा प्रश्न मिटला आहे. मात्र आम्हा मुलांसाठी ही बस सेवा नसल्याने आम्हाला आमच्या गावापासून तीन किलोमीटर पर्यंत पायी प्रवास करून बस फाट्यावर बसची वाट पाहत उभे राहावे लागते. यातच सध्या पावसाळा असल्याने अनेकदा पावसात भिजत जावे लागते. बस वेळेवर न आल्यास शाळेस उशीर होतो. अनेकदा बस लवकर निघून गेली तर त्या दिवशीची शाळाही बुडते. आम्हा मुलांसाठीही थेट आमच्या गावातून बस सेवा उपलब्ध करावी. भावेश शिंदे, विद्यार्थी,(इयत्ता ९ वी ),सावरगाव म्हस्के चौकट- शासनाने मुलींसाठी मोफत बस सेवा उपलब्ध केली. त्याचप्रमाणे मुलांसाठी पास चे भाडे घेऊन का होत नाही ही बस सेवा थेट गावातून सुरू करावी. अनेक मुलांना शिक्षणासाठी ऊन, वारा, पाऊस याचा त्रास सहन करीत ३ ते ५ किलोमीटर पर्यंत पायपीट करावी लागते. याशिवाय मुलींसाठी बस सेवा देणे व मुलांसाठी न देणे यातून स्त्री पुरुष समानता या तत्त्वाची पायमल्ली ही होत आहे. तेव्हा मुलींप्रमाणे मुलांसाठीही मानव विकास बस सेवा प्रत्येक गावातून सुरू करण्यात यावी. भारती गोफणे, सरपंच, भातोडी. फोटो - गावापासून तीन किलोमीटरची पायपीट करून शनिवारी सावरगाव म्हस्के फाट्यावर सकाळच्या शाळेसाठी नियमित बसची वाट पाहत बसलेली ही मुले.

# श्री संत सावळी माळी पुण्यतिथी समितीच्या अध्यक्षपदी अश्विन अंबेकर

उपाध्यक्षपदी ज्ञानेश्वर धानुरे, वैजिनाथ नागरे, रामभाऊ पाऊलबुध्दे, कार्याध्यक्षपदी निवृत्ती गायके



**जालना - प्रतिनिधी**

राष्ट्रसंत शिरोमणी सावता महाराज यांच्या आगामी पुण्यतिथी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर जालन्यात माळी समाज, माळी महासंघ, सावता परिषद आणि वारकरी संप्रदायाची १९ जुलै २०२६ रोजी राजारामनगर येथील सावता भवनात बैठक खेळीमेळीत पार पडली. या बैठकीत खालीलप्रमाणे कार्यकारिणी जाहिर करण्यात आली. अध्यक्ष: अश्विन अंबेकर, कार्याध्यक्ष: निवृत्ती गायके, शिवनाथ पाऊलबुध्दे, नंदु जावळे, उपाध्यक्ष -ज्ञानेश्वर धानुरे, वैजिनाथ नागरे,संतोष जमधडे, लक्ष्मण इधाटे, राजु विठ्ठल इंगळे, रामभाऊ शेषराव पाऊलबुध्दे , रमेश मुळे, प्रभु शिंदे, विशाल धानुरे, सचिन वानखेडे, नितीन तायडे, दशरथ तोंडुळे, निवृत्ती गायके, निलेश वानखेडे, संदीप जैवळ, भगवान खरात, शिवकुमार राऊत, गंगुबाई वानखेडे, मंगला खांडेभराड, रंगनाथ वानखेडे, अनिल वाघमारे, राहुल रायकर, गणेश वाघमारे,अशोक खांडेभराड, राहुल रायकर, रामभाऊ जाधव, शिवलाल घाडगे, संतोष गायकवाड, सचिन *(पान २ वर)*

# शिक्षण क्षेत्रातील गोंधळाविरोधात परतूरमध्ये तीव्र निदर्शने; केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी

सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या उपोषणाला पाठिंबा; उपविभागीय अधिकाऱ्यांमार्फत राष्ट्रपतींना निवेदन

**परतूर - प्रतिनिधी**

देशातील शिक्षण क्षेत्रात निर्माण झालेल्या विविध समस्या, स्पर्धा परीक्षांमधील अनियमितता आणि प्रश्नपत्रिका फुटण्याच्या वाढत्या घटनांमुळे विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात आले आहे. या गंभीर प्रश्नांकडे केंद्र सरकारचे लक्ष वेधण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी सुरू केलेल्या उपोषणाची तातडीने दखल घ्यावी, या मागणीसाठी आज (दि. २० जुलै २०२६) परतूर




येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर शिक्षणप्रेमी नागरिकांच्या वतीने तीव्र निदर्शने करण्यात आली. यावेळी आंदोलकांनी उपविभागीय अधिकाऱ्यांमार्फत भारताच्या माननीय राष्ट्रपती महोदयांना आपल्या मागण्यांचे निवेदन सादर केले.निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, देशातील विविध स्पर्धा परीक्षांमधील अनियमितता, वारंवार होणारे पेपर फुटीचे प्रकार आणि परीक्षा पद्धतीमधील पारदर्शकतेचा अभाव यामुळे लाखो विद्यार्थ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. केंद्र सरकार विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित या गंभीर प्रश्नांवर प्रभावी उपाययोजना करण्यात पूर्णपणे *(पान २ वर)*

# दुचाकी वाहनांसाठी २२ जुलै पासून नव्या क्रमांकाची मालिका

**जालना - प्रतिनिधी**

नॉन ट्रान्सपोर्ट टु व्हीलर मोटार सायकल नोंदणी मालिका एमएच २१ सी एल- सद्यस्थितीत सुरु असून सदर मालिकेतील क्रमांकाचे वाटप पुर्ण होत आहे. त्या अनुषंगाने नॉन ट्रान्सपोर्ट टु व्हीलर मोटार सायकल वाहनांसाठी एमएच- २१ सी पी ०००१ ते ९९९९ (MH-21 CP- -२१ - ०००१ to ९९९९) हि मालिका दिनांक २२ जुलै, २०२६ पासून सुरु करण्यात येणार आहे.

ज्या वाहन धारकांना पसंतीचा नोंदणी क्रमांक घ्यावयाचा आहे. त्यांनी आपल्या विहीत नमुन्यातील अर्जासोबत राष्ट्रीयकृत बँकेचा मुळ किमतीचा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, जालना ( DY.R.T.O. JALNA) यांचे नांवे धनाकर्ष, ओळखपत्राच्या (आधारकार्ड) छायांकित प्रतिसह (स्वयंसाक्षांकीत), पॅनकार्ड व भ्रमणध्वनी क्रमांकासह दिनांक २२ जुलै, २०२६ रोजी दुपारी २:०० वाजेपर्यंत कार्यालयात अर्ज जमा करावा. सदर मालिकेतील आकर्षक क्रमांकाचे वाटप महाराष्ट्र मोटार वाहन नियम व मा. परिवहन आयुक्तांचे परिपत्रकानुसार करण्यात येणार आहे. तसेच एकाच आकर्षक क्रमांकासाठी अनेक अर्जदारांनी अर्ज केल्यास त्यासाठी विहीत पध्दतीने लिलावाची प्रक्रिया अवलंबिण्यात येईल. एका क्रमांकासाठी एका पेक्षा जास्त अर्ज आलेले असतील तर एका क्रमांकासाठी एका पेक्षा जास्त आलेल्या अर्जदारांनी वाढीव रकमेचा एक धनाकर्ष आणणे आवश्यक आहे. पहिला धनाकर्ष मुळ किंमतीचा व दुसरा धनाकर्ष आपण लावलेल्या बोलीच्या वाढीच्या रकमेचा असावा. सदरील धनाकर्ष विहीत शुल्कापेक्षा सर्वात जास्त रकमेचे ज्यांचे असतील त्यांनाच सदर क्रमांक आरक्षित करुन दिला जाईल. सर्व संबंधीतांनी उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, जालना (DY.R.T.O. JALNA ) यांचे नावावर आपले धनाकर्ष बंद लिफाफ्यात दिनांक २३ जुलै, २०२६ रोजी दुपारी १:०० वाजेपर्यंत सादर करावे. सदर वेळेनंतर कोणत्याही सबबीवर धनाकर्ष जमा करुन घेण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी. तसेच दुपारी ३:०० वाजता बंद लिफाफे उघडण्यात येतील. त्यावेळी सर्व संबंधितांनी उपस्थित राहावे. अशी माहिती उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, मनिष दौंड यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.